divyamarathi.com

# अंबा एक्स्प्रेस आता होणार २५ डब्यांची

प्रतिनिधी | अमरावती

पश्चिम विदर्भाची लाईफ लाईन असलेली अमरावती-मुंबई अंबा एक्स्प्रेस २५ डब्यांची होणार आहे.

या गाडीला बोगी वाढविण्याचा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाद्वारे मंजूर करण्यात आला असून १ जूलै २०१५ पासून अमरावती रेल्वे गाडीला ६ बोगी नव्याने जोडण्यात येणार आहे. दरम्यान, गाडीच्या वेळेतही बदल करण्यात येणार आहे. खासदार आनंदराव अडसूळ यांनी या मागणीसाठी रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. नव्याने लागणाऱ्या ६ डब्यांच्या बोगीमध्ये २ वातानुकूलीत, ३ स्लीपर, व १ सामान्य बोगी जोडली जाईल. ही गाडी १ जूलै २०१५ पासून २५ डब्यांची होणार आहे. मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनल्स येथून फलाट क्रमांक १५ किंवा १६ वर पाहेचणार व सोडण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले. रेल्वे मंत्रालयाद्वारे दिलेल्या सूचनेनुसार दरवर्षी जूलै महिन्यात होणाऱ्या वेळापत्रकाच्या बदलानुसार अमरावती-मुंबई रेल्वे गाडीची वेळ सायंकाळी ८ वाजून ५ मिनीला अमरावती येथून ही गाडी सुटेल.

## १ जुलैपासून लागतील जादा डबे

अमरावती-मुंबई ही गाडी आर्थिकदृष्ट्या रेल्वे प्रशासनास फायदेशीर आहे. रेल्वे डब्यांची संख्या कमी असल्यामुळे व प्रवाश्यांचा प्रचंड प्रतिसाद असल्यामुळे या गाडीने प्रवास करणाऱ्यांची वेटिंग संख्या सर्वाधिक आहे. प्रवाशांचे होणारे हाल व तक्रारींमुळे या गाडीला जादा डबे जोडले जावे यासंदर्भात रेल्वे मंत्रालयाकडे मागणी केली होती. सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर १ जूलैपासून या गाडीला जादा डबे असतील.

**आनंदराव अडसूळ,** खासदार.